महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
**पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट**
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ११७ वा | बुधवार, दि. ०३ डिसेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# राज्यात लोकशाहीच्या सर्वोच्च उत्सवाला गालबोट; सत्तासंघर्ष शिगेला

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यामध्ये नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या मतदानाला सुरुवात झाली आहे. राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींच्या 264 अध्यक्षपदांच्या आणि 6 हजार 42 सदस्यपदांसाठी मतदान होत आहे. सकाळपासून मतदानासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसत आहे. त्याचवेळी अनेक ठिकाणी दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. तर काही ठिकाणी मतदानाला सुरुवात झाल्यानंतर काही वेळातच ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याचे पाहायला मिळत आहे, तर दुसरीकडे मात्र अनेक ठिकाणी मतदान केंद्रांवर मोठे वादविवाद झाल्याचे प्रकारही समोर आले आहेत.

**गेवराईत मतदान सुरु असताना दगडफेक, तोडफोड**

बीडमधील गेवराईत राष्ट्रवादी-भाजपचे कार्यकर्ते आमने सामने येऊन भाजपचे माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या घरासमोर दगडफेक करण्यात आली. बुलढाण्यात आमदार संजय गायकवाडांच्या मुलाने व पुतण्याने पोलिसांशी हुज्जत घालून बोगस मतदाराला पळवून लावले, असा आरोप रोहित पवारांनी केला. रायगडात शिंदे गटातील भरत गोगावलेंचे पूत्र विकास गोगावले विरुद्ध अजित पवार गटाचे सुशांत जाबरे यांच्या समर्थकांमध्ये मोठा राडा झाला.



**चिपळूणमध्ये कार्यकर्ते आमने-सामने**

चिपळूणच्या गोवळकोट परिसरात बूथ लावण्यावरून काँग्रेस आणि शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद झाला. दोन्ही गटांचे कार्यकर्ते आमने-सामने आले. 100 मीटरच्या आत बूथ लावल्याच्या कारणावरून काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाले. दोन्ही गटात शाब्दिक चकमक होऊन वाद झाल्याची माहिती आहे. घटनास्थळी पोलिसांचा मोठा फौजफाटा दाखल झाला. निवडणूक अधिकारी विशाल भोसले यांनीही घटनास्थळी धाव घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाच्या उमेदवाराने 100 मीटरच्या आत बूथ लावल्याचा काँग्रेसचा आरोप आहे. यावरून हा वाद विकोपाला गेल्याची माहिती आहे.

**तासगावमध्ये दोन गटात धक्काबुक्की**

सांगलीच्या तासगाव नगर परिषदेच्या मतदानावेळी बोगस मतदानाचा आरोप करत आमदार रोहित पाटील आणि माजी खासदार संजय काका पाटील यांच्या दोन गटात जोरदार वादावादीचा प्रकार घडला. तासगाव येथील एका बुथवर बोगस मतदान होत असल्याचा आक्षेप रोहित पाटील यांच्या गटाच्या बूत प्रतिनिधींनी घेतला. तसेच विरोधकांनी हातातील मतदार याद्याही हिसकावल्याचा त्यांनी आरोप केला. यानंतर तातडीने आमदार रोहित पाटील हे संबंधित मतदान केंद्रावर दाखल झाले. त्यानंतर रोहित पाटील आणि माजी खासदार संजय काका पाटील यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वादावादीचा प्रकार घडला. यानंतर दोन्ही गटाचे कार्यकतेर्ही एकमेकांच्या अंगावर धावले. पोलिसांनी हस्तक्षेप करत दोन्ही गट वेगवेगळे केले असून या ठिकाणी सध्या तणावपूर्ण वातावरण आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या सर्व घटनांमुळे नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील काही भागांमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासन आणि निवडणूक अधिकारी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

### मुक्ताईनगरमध्ये कट्टर विरोधक मतदानावेळी आमने-सामने

जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगरमध्ये शिवसेनेचे आमदार चंद्रकांत पाटील आणि एकनाथ खडसे हे दोन कट्टर विरोधक मतदान केंद्रावर आमने-सामने आले. दोन्ही नेते मतदारांच्या भेटीगाठी घेत असताना त्यांची वाहने समोरासमोर आल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. यावर बोलताना एकनाथ खडसे म्हणाले की, आमदार मला ओव्हरटेक करून पुढे गेले.गुंडगिरीआमदारांची वाढली आहे. यावर आमदार चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली की, एकनाथ खडसेंना माझी हवा सहन होत नाही. ओव्हरटेक करणं हा काय कायद्याचा भंग आहे का? गावात राहणं बंद करायचं का? खडसे स्वतः रस्ता अडवताय, गुंडगिरी तेच करताय. मी एक गरीब माणूस आहे.

### रायगडमध्ये मोठा राडा

रायगडमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान मोठा राडा झाला. महाड नगरपालिकेच्या मतदान केंद्रावर भरत गोगावले समर्थक आणि जगताप समर्थक यांच्यात हाणामारी झाली. या घटनेत मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले आणि सुशांत जाबरे यांच्या समर्थकांमध्ये संघर्ष झाला. गोगावले समर्थकांनी सुशांत जाबरे यांना मारहाण केली आणि वाहनांची तोडफोड केली. सुशांत जाबरे यांच्या सुरक्षा रक्षकालाही मारहाण करण्यात आली. विकास गोगावले यांनी या घटनेत आपल्यावर रिव्हॉल्वर रोखण्यात आल्याचा गंभीर आरोप केला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, रायगडमध्ये भरत गोगावले समर्थक विरुद्ध जगताप समर्थकांमध्ये मोठा राडा झाल्याचे समोर आले आहे. मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले विरुद्ध सुशांत जाबरे समर्थकांमध्ये मोठी हाणामारी झाली आहे. गोगावले समर्थकांकडून सुशांत जाबरे याला बेदम मारहाण करण्यात आली असून वाहनांची तोडफोड करण्यात आली आहे.

### बदलापूरमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गटात राडा

दुसरीकडे, बदलापूर पोलीस ठाण्याबाहेर भाजप आणि शिवसेना शिंदे गटात राडा झाला. महायुतीतील मित्र पक्ष असलेल्या या दोन गटांमध्ये तुफान राडा झाल्याची माहिती आहे. भाजप उमेदवार रमेश सोळसे यांच्या मुलाला मारहाण झाल्यानंतर हा राडा झाला. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत लाठीचार्ज करून गर्दी पांगवली. प्रभाग क्रमांक 22 मध्ये मतदान केंद्राच्या बाहेर उभा असताना मुलाला मारहाण करत असल्याचा जाब विचारल्याने हा राडा झाल्याची माहिती आहे. शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवार निशा ठाकरे या भाजप उमेदवार विरुद्ध निवडणूक लढवत आहेत. सध्या या परिसरात तणावाचे वातावरण असून पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### जतमध्ये भाजप कार्यकर्ते आणि पोलीस भिडले

जत नगरपरिषदेच्या मतदानादरम्यान शिवाजी पेठ येथील मतदान केंद्रावर भाजप कार्यकर्ते आणि पोलीस यांच्यात जोरदार वादावादी झाली. भाजपच्या महिला उमेदवार प्रणिता यादव यांना मतदान केंद्राबाहेर काढण्यावरून हा वाद सुरू झाला, ज्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. पोलीस उपअधीक्षक सचिन थोरबोले यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. जत येथील शिवाजी पेठेतअसलेल्या शाळा क्रमांक एक येथील मतदान केंद्रावर हा प्रकार घडला. मतदानादरम्यान भाजपचे कार्यकर्ते आणि पोलीस कर्मचारी यांच्यात वाद उफाळला. भाजपच्या प्रभाग 5 मधील महिला उमेदवार प्रणिता यादव यांना मतदान केंद्राबाहेर काढण्यात आले. यावरून महिला पोलीस कर्मचारी आणि प्रणिता यादव यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली.

# सोलापूरात मोहोळ, सांगोला, कुर्डूवाडी, अकलूज, बार्शी, अक्कलकोटमध्ये ईव्हीएम मध्ये बिघाड

**विकणे /भाड्याने देणे आहे**
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील 10 नगरपरिषदांसाठी मंगळवारी (ता. 02 डिसेंबर) सकाळी साडेसातपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. मात्र, पहिल्या तासभरातच मोहोळ, कुडुर्वाडी, सांगोला, अकलूज, बार्शी आणि अक्कलकोट येथील ईव्हीएममध्ये बिघाड झाला, त्यामुळे त्या मशीन बदलून मतदानाची प्रक्रिया पुन्हा सुरळीत सुरू करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अकरा नगरपरिषदा आणि एक नगरपंचायतीची निवडणूक जाहीर झाल्या होत्या. मात्र, मंगळवेढा नगरपरिषद निवडणुकीला स्थगिती देण्यात आली आहे, तर अनगर नगरपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाल्यात जमा आहे. पण अनगरमधील अपिलावरील सुनावणीचा निकाल वेळेत न आल्याने अनगरमधील निवडणुकीला स्थगिती देण्यात आलेली आहे.

एक नगर परिषद वगळता इतर दहा नगरपरिषदांसाठी सुमारे ४९९ केंद्रावर आज सकाळी साडेसातपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. काही वेळ मतदान झाल्यानंतर मोहोळ आणि कुर्डुवाडीतील प्रत्येकी दोन केंद्रांवरील मशिनला कनेक्शनचा अडथळा निर्माण झाला, त्यामुळे तेथील मशीन बदलून मतदान प्रक्रिया सुरळीत करण्यात आली. काही मतदान केंद्रांवरील मशिनची बटणे दबत नव्हती. त्यामुळे तेथील बॅलेट युनिट बदलण्यात आले.





जिल्ह्यातील अकलूज, अक्कलकोट, बार्शी आणि सांगोला येथील सात मतदान केंद्रांवरील बॅलेट युनिट बदलून दुसरे लावण्यात आले आहेत. काही मतदान यंत्रांची बटण दाबली जात नव्हती. काही मशीनची बटणं आतमध्येच अडकून राहत होती, तर काही मतदान यंत्रांची बटणं दबली जात नव्हती, त्यामुळे मतदारांना मतदान करताना अडचणी येत होत्या.

सांगोला येथील विद्या मंदिर प्रशाला, जिल्हा परिषद शाळा धनगर गल्ली, जिल्हा परिषद शाळा भोपळे रोड या मतदान केंद्रांवरील मशिनची बटणे दबली जात नव्हती, त्यामुळे सांगोल्यातील तीनही मशिन बदलण्यात आलेल्या आहेत.

दरम्यान, 'ईव्हीएम' कंपनीच्या अभियंत्यांच्या सूचनांनुसार तेथील मशीन (बीयू-सीयू) बदलण्यात आले आहे. ज्या ठिकाणी अडचणी आल्या, तेथील मतदान केंद्राध्यक्षांशी त्या दोन अभियंत्यांनी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधून मार्गदर्शन करण्यात आले आहे, त्यामुळे मतदान यंत्रातील बिघाड या निवडणुकीच्या वेळी बघायला मिळाले.

राज्य निवडणूक आयोगाने 4 नोव्हेंबर 2025 रोजी राज्यातील 246 नगरपरिषदा आणि 42 नगरपंचायतींच्या (एकूण 288) सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. मात्र, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय 23 नोव्हेंबर 2025 रोजी किंवा त्यानंतर आल्याने 24 नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदाच्या आणि सदस्यपदांच्या निवडणुकांसाठी मतदान पार पडले. नगरपालिका-नगरपंचायत मतदानाची वेळ संपली तरी देखील राज्यातील अनेक केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा दिसून आल्या. तर अनेक ठिकाणी राडा झाल्याचे देखील दिसून आले. आता सर्वांचे लक्ष 21 डिसेंबरच्या निकालाकडे लागले आहे.

बार्शी नगरपरिषद- 63%
पंढरपूर - 64.4%
अकलूज - 69.25%
अक्कलकोट - 64.25%
सांगोला - 78.55%
करमाळा - 72.78%
कुडूर्वाडी - 66.28%
मोहोळ - 71.72%
मैंदर्गी - 72.89%
दुधनी - 70.97%

प्रिय स्मरणार्थ



रुथ मार्टिन कलबांडी
१४ एप्रिल १९६५ - ०१ डिसेंबर २०२५
अत्यंत दुःख आणि वेदनेने हे कळवित आहे की आमच्या प्रिय रुथ यांचे 1 डिसेंबर रोजी निधन झाले आहे.
प्रार्थना त्यांच्या निवासस्थानी होईल, त्यानंतर फर्स्ट चर्च स्मशानभूमी, सोलापूर येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.
परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती लाभो आणि या कठीण प्रसंगी आपल्याला धैर्य मिळो.
०३ डिसेंबर २०२५
सकाळी १०:३० वाजता
वृंदावन पार्क, होटगी रोड
— पवन आणि सॅमसन —

**निरामय पॅरालिसिस सेंटर**
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# सर्व नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील सर्व 288 नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी 21 डिसेंबर 2025 रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही 20 डिसेंबर 2025 रोजी मतदान समाप्तीच्या अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगानेही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

मतदान यंत्रांची हातळणी काळजीपूर्वक करण्यात यावी. मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोदामांसाठी 24 तास चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करावी. सुरक्षा उपकरणे (उदा. गोदामाच्या प्रवेद्वाराबाहेरील सीसीटीव्ही, सुरक्षा आलार्म सिस्टीम, अग्निशमन यंत्रणा इ.) व्यवस्थित कार्यान्वित असल्याची खात्री करून घ्यावी. राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना गोदामांबाबत आणि तिथल्या सुरक्षा व्यवस्थेबाबत अवगत करावे. त्याचबरोबर





निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना गोदामाचे द्वार दिसेल अशा ठिकाणी बसण्यासाठी जागा निश्चित करून द्यावी, असेही निर्देश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

राज्यातील 264 नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान झाले; तसेच सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार 24 नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि 76 नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील 154 सदस्यपदांच्या जागांसाठी 20 डिसेंबर 2025 रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आता 21 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 10 वाजेपासून मतमोजणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

स्थापना १९६७ | शासनमान्य | नोंदणी क्र.इ.३५९ (सोलापूर)

## सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ

हुतात्मा स्मारक,मार्कंडेय उद्यान,अशोक चौक पोलीस चौकी समोर,सोलापूर-४१३००५.

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

**(फक्त सभासदांकरीता)**

सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, सोलापूर या संस्थेच्या सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८/१२/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा. यशोदा गुरुकुल सभागृह, मु.पो. अरण ता.माढा जि. सोलापूर येथे भरेल. सभेस सर्वांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील विषयः-
१) दि. ०८/१२/२०२४ च्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल माहितीसाठी.
३) सन २०२४-२५ चा ऑडिट मेमो व जमाखर्च मंजूरीसाठी.
४) सन २०२५-२६ साठी ऑडिटरची नेमणूक करणेबाबत.
५) सन २०२६-२७ चे अंदाजपत्रक मंजूरीसाठी.
६) सन २०२६ ते २०२९ या कालावधी करीता नविन कार्यकारी मंडळाच्या निवडीस मान्यता देणेबाबत.
७) घटना, नियमावली बदल करणेबाबत.
८) मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.

**टिप :-** १) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच विषयासाठी सभा भरेल यावेळी कोरमची आवश्यकता नाही.
२) सभेसंदर्भातील कागदपत्रे संघाच्या कार्यालयात सभेपूर्वी चार दिवस पाहावयास मिळतील.

सही (कार्यवाह) **साहेबराव शिंदे**
सही (अध्यक्ष) **विजयकुमार पवार**

## संपादकीय

# काय चुकते आहे आपल्या समाजाचे?

तरुण वर्गात आत्महत्येचे वाढत चाललेले प्रमाण हा सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. अगदी शाळेतील मुलेमुलीदेखील क्षुल्लक कारणावरून आत्महत्येचे टोकाचे पाऊल गाठताना दिसतात.

तरुण स्त्रियांच्या आत्महत्यांमागे लैंगिक अत्याचार, मानसिक छळ, अशी कारणे दिसून येतात. पुरुषी बळाचा वापर अजूनही थांबलेला नाही. स्त्री पुरुष समानता म्हणावी त्या प्रमाणात समाजात रुजलेली नाही. शिक्षणाने कुणी संस्कारित, विचारी, विवेकी झाल्याचे दिसत नाही. उलट माणसाची पूर्वकालीन राक्षसी मनोवृत्ती बळावत चाललेली दिसते. पूर्वी आध्यात्मिक संस्काराचा थोडाफार पगडा होता. आता तोही राहिला नाही. पाश्चात्य देशात योग, अध्यात्म याकडे लोक वळताना दिसतात. उलट आपण मात्र अधिकाधिक पाश्चात्य संस्कृतीच्या नादी लागत चाललो आहोत.

तंत्रज्ञानाचा अति वापर आपल्याला अधिकाधिक आळशी, अविचारी, अविवेकी बनवतो आहे. चांगले वाईट याची विवेकी जाण लोप पावते आहे. माहितीच्या धबधब्यात चिंब भिजलेला जीव आतून मात्र कोरडा आहे !आधुनिकतेच्या वाहत्या प्रवाहात नाकातोंडात पाणी जाईपर्यंत आकंठ बुडत चाललेली आधुनिक पिढी आपले मूळ सत्व गमावून बसली आहे. कुणाचा कुणाला धाक राहिला नाही. आपल्या चांगल्या वाईट वागण्याचे काय भले बुरे परिणाम होतील याची भीती राहिली नाही. शिवाय वेगवेगळ्या कारणाने ताण वाढतो आहे तो वेगळाच. भविष्याविषयी संभ्रम, अनिश्चितता ही कारणेही सोबतीला आहेतच. पाल्य, पालकत्व या संबंधातले अंतर वाढते आहे काळाबरोबर. कुटुंबसंस्था पूर्वीसारखी एकसंघ राहिली नाही. एका पिढीचे दुसऱ्या पिढीशी काही देणेघेणे नाही इतका दुरावा वाढला आहे.

लग्नसंस्थेबद्दल तर बोलायलाच नको. लग्न कशासाठी करायचे, त्याची गरजच काय असे प्रश्न सर्रास विचारले जातात नव्या पिढीकडून. अन् अशा प्रश्नाची पोक्त, वयस्क मंडळींकडे समाधानकारक उत्तरं नसतात. तारुण्यसुलभ भावना तर वय विसरून वेळेआधीच उमलायला लागल्या आहेत. दहा बारा वर्षाच्या मुलीला आज सर्व काही कळते. प्रेम, डेटिंग, फ्लर्टिंग, सेक्स असे सारे काही नको त्या वयातच माहिती झाले आहे. सगळे काही उघड्यावर दिसते आहे. कुणाला काही लपवून ठेवण्याचीही गरज वाटत नाही. सगळे काही स्वाभाविक, नैसर्गिक असल्यासारखे खुल्लमखुल्ला चालले आहे.

स्वाभाविकच अशा परिस्थितीत मनासारखे काही घडले नाही तर धक्का बसतो. दिशाहीन भरकटकलेल्या अवस्थेत मनाची चलबिचल होते. अनपेक्षित नैराश्य आले की अस्वस्थता, मनाची बेचैनी वाढते. कुणाजवळ काय बोलायचे, कुणाला काय सांगायचे हे कळेनासे होते. मग अशा वेळी आत्महत्येचे पाऊल उचलले जाते. प्रकरणात एकाऐवजी दोन व्यक्ती असल्या तर एक दुसऱ्याच्या मनस्तापाला, नैराश्याला कारणीभूत होतो. अशा वेळी आत्महत्या की हत्या असेही प्रश्न निर्माण होतात. अशा प्रकरणाचा तपास करणे, छडा लावणे सोपे नसते. खरे माहिती असले तरी सांगायचे नसते. इज्जत का सवाल असतो. कुटुंबाची प्रतिष्ठा आड येते. काही बाबतीत तर राजकीय दबावदेखील असतो, संबंधित मुले मुली बड्या धेंडाची असली तर! अर्थात आता तर न्याय विकत घेता येतो. निर्णय हवा तसा फिरवला जातो. सगळा पैशाचा खेळ असतो. त्यामुळे शेवटपर्यंत हत्या की आत्महत्या हे कळतच नाही. नेमके काय झाले, कसे झाले, का झाले या प्रश्नांची खरी उत्तरं मिळतच नाहीत. नेमकी कारणे बाहेर येत नाही. नेमके समस्येचे स्वरूप कळतच नाही. मग उपाय शोधायचा कसा? अभ्यास, विश्लेषण करायचे कसे? सगळीच गोची आहे या सामाजिक समस्येत. एकूणच प्रकरण वाटते तितके सोपे राहिले नाही आता. ही वस्तुस्थिती आहे.

मग करायचे काय? डोळे मिटून आहे ते चालू द्यायचे? उपाय नाही म्हणून हताश होऊन हात झटकून स्वस्थ बसायचे? याचा अर्थ असा होतो की एकीकडे आपण प्रगती, विकासाच्या, समाज सुधारणेच्या गोष्टी करतो. राजकारणी पक्ष ही हीच भाषा बोलतात. विकासाला मते द्या? कशाचा विकास? कुणाचा विकास? मोठमोठ्या गगनचुंबी सिमेंटच्या इमारती, महामार्ग, फ्लायओव्हर, रेल्वेचे, मेट्रोचे जाळे म्हणजे विकास? माणूस आतून खचत चाललाय, खंगत चाललाय, पोकळ होत चाललाय, त्याचे काय? आपण मानसिक दृष्ट्या दुबळे होत चाललो, आपले आपल्यावर नियंत्रण राहिले नाही, आपण चांगले वाईट याची पारख करण्याची दृष्टी गमावून बसलो. म्हणून आपले नियंत्रण ढासळते. म्हणून आपला मानसिक तोल ढासळतो. म्हणून आत्महत्या होतात. संवाद हरवला आहे. मैत्री राहिली नाही पूवीसारखी. एकमेकांवर विश्वास राहिला नाही. स्वार्थ बोकाळला आहे. मी, माझे एवढीच विचारांची त्रिज्या. कुपमंडुक वृत्ती.

आपण इथपर्यंत आलो ते सहकार भावनेने, एकमेकांच्या मदतीने. हाच तर फरक होता, आहे माणसात अन् जनावरात. माणूस कळपात राहून, एकमेकांशी सहकार्य करून, हातात हात धरूनच मोठा झाला, संस्कारित झाला. आता माणसापेक्षा जनावरे बरी असे म्हणण्याची वेळ येत चाललीय! ही धोक्याची घंटा आहे मानव जातीसाठी. आत्महत्येने आपण आपले शरीर गमावून बसतो. कारण त्या शरीरात असलेल्या मनाकडे आपण संपूर्ण दुर्लक्ष केलेले असते. मनाचे ऐकलेले नसते. मनातील भावनांना तिलांजली दिली असते. म्हणून आपल्यावर श्रद्धांजली स्वीकारण्याची पाळी येते. एवढे सोपे गणित आहे. ते वेळीच समजले, सुटले तर क्या बात है!!

# आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनाचे समाजशास्त्रीय चिंतन

समाज ही केवळ लोकांची रचना नसून, तिच्या प्रत्येक घटकाच्या सहभागावर आधारित एक सजीव प्रणाली आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानाचा स्तर, संधी, अधिकार आणि सामाजिक प्रतिष्ठा त्याच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबूनअसते. या दृष्टीने पाहिल्यास, अपंग व्यक्तींचा अनुभव केवळ वैयक्तिक अडचणींचा विषय नसून तो संपूर्ण समाजाच्या मानसिकता, मूल्य प्रणाली, धोरणे आणि व्यवहार यांचे प्रतिबिंब आहे. दरवर्षी ३ डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन' हा दिवस केवळ जागरूकता निर्माण करण्यापुरताच नाही, तर तो समाजातील समावेशी धोरणांचा विचार करण्याचा, अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणी ओळखण्याचा, त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून, अपंग व्यक्ती ही एक सामाजिक गट म्हणून दिसते, ज्यांच्यावर शारीरिक, मानसिक किंवा अन्य अडचणींमुळे अनेक स्तरांवर भेदभाव होतो, आणि त्यांच्या सामाजिक सहभागाला मयार्दा येतात. शिक्षणाच्या क्षेत्रात, अपंग व्यक्तींना अनेकदा विशेष शैक्षणिक साधने, समायोजने आणि सहाय्य उपलब्ध नसते, ज्यामुळे त्यांचे बौद्धिक, कौशल्यात्मक आणि सामाजिक विकासावर थेट परिणाम होतो. याचा प्रभाव भविष्यातील रोजगाराच्या संधींवर, आर्थिक स्वावलंबनावर, आत्मसन्मानावर आणि समाजातील प्रतिष्ठेवर पडतो. रोजगार क्षेत्रातही अपंग व्यक्तींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, जसे की कार्यक्षेत्रात आवश्यक सुविधा न मिळणे, अपंगतेवर आधारित पूर्वग्रह, किंवा त्यांच्या क्षमतांबाबत चुकीची समजुती निर्माण करणे. याचा थेट परिणाम त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर, सामाजिक सहभागावर आणि मानसिक स्वास्थ्यावर होतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे स्पष्ट होते की अपंग व्यक्तींच्या जीवनातील ह्या अडचणी केवळ वैयक्तिक नसून त्या समाजाच्या मानसिकता, मूल्ये, धोरणे आणि सामाजिक संरचना यांच्याशी संबंधित आहेत. अपंग व्यक्तींच्या जीवनात करुणा, दया, उपेक्षा किंवा अस्वीकृतीची भावनाही समाजातील अपूर्ण मानसिक प्रतिमांनाचे प्रतीक आहे. जर समाजाने अपंग व्यक्तींविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला, त्यांना योग्य संधी उपलब्ध करून दिल्या, सार्वजनिक जागांमध्ये सुलभता निर्माण केली आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमात समावेश केला, तर समाजाच्या नैतिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीला मोठा गती मिळेल. अपंग व्यक्तींचा सामाजिक सहभाग मर्यादित असल्यास त्यांच्या अनुभवांचा, मतांचा आणि कल्पनांचा समाजाच्या निर्णय प्रक्रियेत समावेश होत नाही, ज्यामुळे संपूर्ण समाजाच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

सामाजिक समावेश, समान संधी, सार्वजनिक स्वीकृती आणि न्याय यासाठी धोरणात्मक उपाय करणे ही फक्त नैतिक जबाबदारी नसून समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यावश्यक आवश्यकता आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार आणि संधी उपलब्ध करून दिल्यास, ते केवळ स्वतःच्या जीवनात उन्नती करतात, तर समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान देतात. अपंग व्यक्तींच्या अडचणी शारीरिक, मानसिक किंवा संवेदनशीलता यांच्या पलीकडे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्तरावर प्रतिबिंबित होतात. सामाजिक जीवनात त्यांच्या सहभागाची मयार्दा असल्यास, समाजाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांच्या अनुभवांचा आणि दृष्टिकोनांचा समावेश होत नाही, ज्याचा परिणाम संपूर्ण सामाजिक प्रगतीवर होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे लक्षात येते की अपंग व्यक्तींच्या अडचणींचे निराकरण ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. योग्य शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा, सार्वजनिक सुविधा, सामाजिक जागरूकता आणि समावेशी धोरणे या माध्यमातूनच अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवता येते.

जगातील अनेक देशांनी अपंग व्यक्तींना समान संधी आणि अधिकार सुनिश्चित करणारे कायदे लागू केले आहेत, परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी, समाजाची मानसिकता बदलणे आणि सार्वजनिक स्वीकृती सुनिश्चित करणे हेच खरे उपाय ठरतात. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणींचा अभ्यास केवळ त्यांच्या अडचणी ओळखण्यापुरताच मर्यादित राहणार नाही, तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्यावर उपाय सुचवणे, सामाजिक समज वाढवणे आणि समावेशी समाज घडविणे आवश्यक आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांच्या स्वतःसाठी नाही, तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. यासाठी शासन, शाळा, रोजगार क्षेत्र, समुदाय, कुटुंब आणि प्रत्येक नागरिकाचे सकारात्मक योगदान आवश्यक आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार, संधी आणि सार्वजनिक स्वीकृती उपलब्ध झाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि नैतिक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात.

समाजातील समावेश, सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वांगीक विकासासाठी अपंग व्यक्तींच्या जीवनमानातील सुधारणा ही अत्यंत गरजेची बाब आहे. सामाजिक अडथळे दूर करून, समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास मानला जातो. अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करण्यासाठी सामाजिक अभियान, सार्वजनिक धोरणे, सामूहिक चर्चासत्रे, शैक्षणिक कार्यक्रम आणि माध्यमांतून जनजागृती करणे आवश्यक आहे. हे उपाय फक्त कागदोपत्री नसून प्रत्यक्ष सामाजिक बदल घडवू शकतात. समाजातील प्रत्येक घटकाचे जीवन सन्माननीय असावे, सर्वांना समान संधी मिळाव्यात आणि अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवून आणणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडथळे दूर करणे आणि त्यांना समान संधी देणे हे समाजाची नैतिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगती सुनिश्चित करते.

३ डिसेंबर हा दिवस फक्त स्मरणार्थ किंवा जागरूकतेसाठी नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला विचार करण्याची, आपले मानसिक प्रतिमान बदलण्याची, आणि समावेशी धोरणे अंगीकारण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा हा प्रश्न समाजाच्या सर्व घटकांशी संबंधित आहे. अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य, आणि सामाजिक स्वीकृती दिल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देतात. त्यामुळे आजच्या आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनानिमित्त समाजातील प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मानसिकतेचा आढावा घ्यावा, अपंग व्यक्तींविषयी संवेदनशीलता वाढवावी, आणि त्यांना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी देण्यासाठी प्रयत्न करावे. अपंग व्यक्तींच्या समस्यांचे निराकरण करणे, त्यांना समान अधिकार, संधी, आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर समाजाच्या नैतिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीसाठी अनिवार्य आहे.

आजही अनेक ठिकाणी अपंग व्यक्तींवर विविध स्वरूपातील भेदभाव दिसून येतो; सामाजिक समावेश, समान संधी आणि सार्वजनिक स्वीकृतीची गरज अजूनही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे अपंग व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहभागाला चालना देणे, त्यांच्या अधिकारांसाठी लढणे, आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलणे हे केवळ आव्हान नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांची समस्या नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, आणि त्यासाठी प्रत्येक घटकाला शासन, शाळा, कामकाजाचे ठिकाण, समुदाय आणि कुटुंब सकारात्मक भूमिका पार पाडणे आवश्यक आहे. अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वीकृती मिळाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणेचा प्रश्न हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी जोडलेला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन फक्त स्मरणार्थ दिवस नाही, तर तो समाजाला सुधारणा घडविण्यासाठी, सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी, आणि अपंग व्यक्तींना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रेरित करणारा एक महत्त्वपूर्ण दिन आहे. समाजातील अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करून त्यांना समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास आणि मानवतेची खरी कसोटी आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# मानवता प्रेम । मना देई बळ

एक तंदुरुस्ती हजार नियामत अशी एक म्हण प्रसिद्ध आहे. इंग्रजीमध्ये Health is wealth असा त्याच अर्थाचा दुसरा विचारही प्रसिद्ध आहेच. हिंदीमधील म्हण जुनी असावी. कारण तिच्यामध्ये आरोग्यसंपन्न माणूस हा हजार रुपये बाळगणाऱ्याशी तुलना करता येईल, असा असतो असं म्हटलंय. एका संस्कृत सुभाषितात आरोग्य धनसंपदाम असं स्पष्ट करताना दुसऱ्या ठिकाणी शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् असं उगीच म्हटलेलं नाही. आधुनिक विचारवंत तर 'Sound mind in sound body' असा शरीरसामर्थ्याचा गौरवच करतात.

शरीराचं आरोग्य किंवा शारीरिक शक्ती अशाप्रकारे जगण्याचं महत्त्वाचं साधन आहे, यात वादच नाही. पण शारीरिक सामर्थ्यातून मनाला शक्ती मिळतेच, असं नाही. समाजातील कुत्सित बहाद्दर पैलवानांची त्यांचा गुडघ्यात मेंदू असतो असं म्हणून निर्भर्त्सना करतात, कारण बालवयापासून बलोपासनेमागे लागलेले बरेच पैलवान उत्तरायुष्यात गावाला उपद्रव तरी ठरतात किंवा खादीला काळ धरणीला भार तरी ठरतात, हे वास्तव आहेच. त्यांच्या शक्तीमुळे त्यांच्या घराकडे कुणी वाकड्या नजरेने पाहात नसेल. पण हे बहाद्दर समाजकारण, राजकारण, समाजशिक्षण, परोपकारी सामाजिक उपक्रम या कशातही सहभागी होत नाहीत. रामायण कालातील मारुती नावाचा वानरवंशी माणूस (माकड नव्हे) तेवढाच बुद्धिमत्तां वरिष्ठम होता, असं म्हटलंय. पण शिवकाळातील रामदासांनाही शक्तिमान माणसाने बुद्धीचीही उपासना करावी, असं वाटलं नाही. त्यांनी बलोपासनेसाठी शेपूटधारी हनुमानाची मंदिरं गावोगावी स्थापून आखाडे काढण्यास प्रोत्साहन दिलं, पण त्या पैलवानांचा गुडघ्यातील मेंदू डोक्यात जाण्याची काही सोय केली नाही.

छत्रपती शाहू महाराज हे महात्मा फुले यांच्यानंतर त्यांचा वारसा समर्थपणे चालवणारे समाजसेवक, समाजोद्धारक आणि सत्यशोधक होते. त्यांची बलोपासना जशी धन्य आहे, तशीच त्यांची ज्ञानोपासनाही धन्यच आहे. कोल्हापुरात गल्लीगल्लीतून तालीम मंडळ स्थापन करून राजवाड्याच्या मोतीबाग तालमीत पैलवानांना कुस्त्यांचे डावपेच शिकवणारे हे वस्ताद छत्रपती शाहू, लोकमान्यांचेही वस्ताद ठरले. छत्रपती शाहूंच्या सर्व जातीजमातींना समान न्याय देण्याच्या भूमिकेमुळे आणि प्रामुख्याने प्राथमिक शिक्षणाला त्यांनी दिलेल्या प्राधान्यामुळे केसरीतून छत्रपती शाहूंवर बोचरी जहरी टीका केसरीकार नेहमी करत. छत्रपती शाहूंनी एकदा पुण्यात त्यांच्या घरी जाऊन टेबलावर फेटा ठेवून, फेटा विसरून जायला निघाल्याचं नाटक केलं. टिळकांनी 'महाराज आपला फेटा !' असं म्हणून फेटा उचलला. महाराजांनी मस्तक वाकवलं. टिळकांनी त्यांच्या डोईवर फेटा ठेवला. मग महाराज टिळकांना हसत म्हणाले, 'डोक्यावर फेटा ठेवलात, आता त्याचा मान ठेवा म्हणजे झालं.' महाराज असे वस्तादांचे वस्ताद होते. लोकमान्य जे समजायचे ते समजून राहिले. हे आहे मानसिक सामर्थ्य !

शारीरिक सामर्थ्य हा मानसिक सामर्थ्याचा पाया निश्चितच आहे. पण मानसिक सामर्थ्य एकदा प्रयत्नपूर्वक वाढत गेलं, की मग महात्मा गांधीजींसारखा शारीरिक शक्तीने दुबळा माणूसही जगाला हादरे देऊन बलाढ्य शत्रूला सळो की पळो करू शकतो. मात्र मानसिक शक्ती ही चिंतन, मनन, अध्ययन, अध्यापन, वक्तृत्व आणि प्रामुख्याने सत्यशोधनानेच प्राप्त होते. भजन-पूजन, ईश्वरचिंतन, कीर्तन-प्रवचन या आध्यात्मिक खटाटोपाने मनाचं सामर्थ्य उलट कमी होतं. ईश्वरावलंबन, सद्गुरूशरणता, जपजाप्याचे जंजाळ या सर्व त्रासदायक गोष्टी दुबळ्या भाविकाला दोन्ही दृष्टींनी अधिक दुबळा बनवतात.

आस्तिक्यबुद्धी हा पांगुळगाडा आहे. तो सुदृढ शरीराच्या आणि मनाच्या माणसांनी वापरणे हा मुर्खपणा आहे. ईश्वर ही कल्पना खोटी आहे हे समजून घेणं म्हणजेच पांगुळगाडा टाकून स्वतःच्या पायावर चालणे. तेव्हा लक्षात असू दे-

मन ज्याचे मोठे । माणूस तो मोठा
जीवनाला मोठा । अर्थ त्याच्या ॥। १
सत्य शोधण्यात। गुंतवा मनाला
वाढवी धैयार्ला । प्राप्त सत्य ॥ २
मनाचे जनाचे। अभ्यासा वर्तन
सत्याचे दर्शन । होण्यासाठी ॥३
सत्य करा प्राप्त। तीच मनःशक्ती
खोट्याची फजिती। करा धैर्ये ॥४
पराभूतपणा । दूर पिटाळावा
उत्साह वाढवा । नाना यत्ने ॥५
देव आणि धर्म। मनाचे हे रोग
करा त्यांचा त्याग। धीटपणे ॥ ६
अध्यात्म नावाच्या। पांगुळगाड्याची
मैत्री विनाशाची । वाट दावी ॥७
मानवता प्रेम। मना देई बळ
मनाचा स्नेहाळ । तोच थोर ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सोलापूरमध्ये शैक्षणिक सहलींसाठी 'लालपरी' बस सेवा लोकप्रिय

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांच्या शैक्षणिक सहलींना राज्य परिवहन महामंडळाच्या 'लालपरी' मोठी पसंती मिळत आहे. सुरक्षित प्रवास, विश्वासार्ह सेवा तसेच तिकीट दरात दिली जाणारी ५० टक्के सवलत यामुळे खासगी बसपेक्षा एसटीला अधिक मागणी वाढली आहे. नोव्हेंबर अखेरपर्यंत ९० ते ९५ एसटी बस बुक झाल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, नोव्हेंबर ते जानेवारी हा काळ शाळा-महाविद्यालयांच्या सहलींचा हंगाम मानला जातो. या हंगामाची सुरुवात होताच सोलापूर



विभागातील नऊ आगारांमधून सहलींसाठी विशेष एसटी बसेस उपलब्ध करून दिल्या जात आहेत. काही महिन्यांपूर्वी विभागात आलेल्या नव्या बसेससह उत्तम स्थितीत असलेल्या लालपरी या शैक्षणिक सहलींसाठी धावत असून, विद्यार्थ्यांचा प्रवास आनंददायी व सुरक्षित व्हावा यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

महामंडळाकडून शैक्षणिक सहलींसाठी देण्यात येणाऱ्या सवलतींचा शाळा-महाविद्यालयांना मोठा लाभ होत आहे. कमी खर्चात अधिक सुरक्षित व विश्वसनीय प्रवास मिळत असल्याने शैक्षणिक सहलींसाठी एसटीची मागणी वर्षानुवर्षे वाढताना दिसत आहे. या माध्यमातून विभागाचा महसूलही वाढण्यास मदत होणार आहे. जानेवारी महिन्यातही सहलींची मालिका सुरू राहणार असल्याने एसटी बस बुकिंगची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सोलापूरकरांकडून विश्वविजेत्या गंगाचे जंगी स्वागत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विमानतळावर पोलिस बँडची धून... फुलांचा वर्षाव.. देशभक्तिपर गीतांनी भारलेले वातावरण... दमाणी अंध शाळेच्या विद्यार्थ्यांच्या लेझीम अन् ढोल पथकाचा निनाद...उघड्या कारमधून विश्वविजेत्या भारतीय संघाची उपकर्णधार व सोलापूरची लाडकी लेक गंगा कदम हिची मिरवणुकीने प्रत्येक सोलापूरकरांची मान उंचावली.



जागतिक अंधाची विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताच्या संघाने विश्वकरंडक स्पर्धा जिंकली. भारतीय संघाचे प्रतिनिधित्व उपकर्णधार नात्याने गंगा कदम हिने केले. विश्वचषक जिंकल्यानंतर पहिल्यांदाच तिचे सोलापुरात आगमन झाले. मुंबई येथून विमानाने गंगाचे आगमन झाले. होटगी रोड विमानतळावर दमाणीनगर अंध शाळेच्या वतीने तीचे जंगी स्वागत करण्यात आले. पोलिस बँड पथकाने देशभक्तिपर गिते सादर करत वातावरणात उत्साह भरला.

तेथून उघड्या वाहनावर गंगाची मिरवणूक निघाली. त्यासोबत दमाणी अंध विद्यामंदिरच्या वाहनात विद्यार्थी एकत्र आलेले होते. मिरवणूक आसरा, सातरस्ता, मोदीखाना मार्गे दमाणी विद्यामंदिर परिसरात पोचली. त्याठिकाणी आतषबाजी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने ढोलच्या तालावर मिरवणूक काढली. दमाणी अंध विद्यामंदिरच्या प्रांगणात रांगोळी काढण्यात आली होती. यावेळी शिक्षिकांनी औक्षण करून गंगाचे स्वागत केले. त्यानंतर दमाणी अंध विद्या मंदिरचे अध्यक्ष संतोष सपकाळ, सचिव संतोष भंडारी, जैन संघटनेचे राज्याध्यक्ष केतन शहा, नाट्य कलावंत किरण फडके, मुख्याध्यापक प्रकाश दर्शनाळे व शिक्षक उपस्थित होते.

गंगा कदम म्हणाली, मी लहानपणापासून दमाणी अंध विद्यामंदिरमध्ये शिकले. सरांना मला क्रिकेट खेळू द्या, असे म्हणायचे. शिक्षकांनी संधी दिली. अकरावीला पहिल्यांदा नाशिकला क्रिकेट मॅच खेळल्यानंतर माज्या शिक्षकांनी मला प्रगतीचे प्रोत्साहन दिले. विश्वचषक स्पर्धेत समोर अनुभवी नेपाळचा संघ होता. पण आमच्या कोचने सांगितले की, त्यांचे व आपले सारखेच खेळाडू असतील जिंकण्याची संधी आपल्याला देखील आहे. त्यांच्या प्रेरणाने उत्साह भरला. आमच्या संघात सर्व अष्टपैलू खेळाडू होते. एकदिलाने लढलो व जिंकलो. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आम्हा निमंत्रित केले. त्यांनी आमची आवडनिवड आस्थेने विचारली. एका बॅटवर आमच्या स्वाक्षऱ्या देखील घेतली. त्यांच्या प्रेमळ स्वभावाने मी प्रभावीत झाले. आता पुढे मला क्रिकेटमध्ये करिअर करायचे आहे.

# महाराष्ट्र 'राजभवन'; झाले आता 'लोकभवन'

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनचे नाव आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत.

राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोक कल्याणासाठी समर्पित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय दिशादर्शक आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

'लोकभवन' म्हणून ओळखले जाणारे राजभवन आता केवळ राज्यपालांचे निवासस्थान व कार्यालय न राहता, राज्यातील नागरिक, समाजातील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी




संवाद व सहभाग यांचे एक केंद्र व्हावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

'लोकभवन' हे सरकार आणि राज्यातील जनतेमध्ये सेवा, सहकार्य व संवादाचा सेतू व्हावे, हीच या नामांतरामागची भूमिका आहे, असे त्यांनी सांगितले.

'लोकभवन' केवळ संवैधानिक कर्तव्यांपुरते मर्यादित न राहता, समाजाच्या आशा, आकांक्षा आणि समस्यांप्रति संवेदनशील राहून त्यांच्याशी थेट नाते जपणारे खऱ्या अर्थाने लोकभवन असेल असे राज्यपालांनी स्पष्ट केले.

## वात्रटिका

### लांबले सुख, धाकधूक

घडणार होते आज
ते थोडे पुढे ढकलले...
खुर्ची आणि सत्तेचे स्वप्न
मनात नव्याने रंगले...
घडेल बिघडेल वाटते काही
कुठे उत्साह, कुठे धाकधूक...
लांबले आहेच तर मग जरा
मनातल्या मनात घेऊ सुख...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003

फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.

Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**


# संसद ग्रंथालय 'शोभेची वास्तू'

## ९०% खासदार वाचनाशिवायच करतात राष्ट्रनिर्मिती ?

**नवी दिल्ली (कटूसत्य वृत्त):-** जनतेला मार्गदर्शन करणारे, उपदेश करणारे, देशाच्या धोरणांवर निर्णय घेणारे आणि कायदे करणारे खासदार स्वतः मात्र वाचनाच्या बाबतीत अत्यंत उदासीन असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. संसदेच्या ग्रंथालयाने प्रसिद्ध केलेल्या मे २०२४ च्या अधिकृत आकडेवारीनुसार, लोकसभेतील सदस्यांपैकी केवळ ४२ खासदारांनीच गेल्या सत्रात ग्रंथालयाचा वापर केला. उर्वरित ९० टक्क्यांहून अधिक खासदारांनी एकही पुस्तक हाती घेतले नाही, किंवा एकही डिजिटल दस्तऐवज डाउनलोडही केला नाही.

संसद ग्रंथालयात खजिना, पण वाचक नाहीत.देशातील सर्वोच्च धोरणनिवासी घरांपैकी एक असणाऱ्या संसद ग्रंथालयात प्रचंड माहिती-संपत्ती उपलब्ध आहे.

३४,५०० हून अधिक पुस्तके, इंटरनेटवर ३५,000 च्या आसपास लेख,२०० प्रकाशकांकडून ७५ विषयांवरील सुमारे १ कोटी २० लाख जर्नल्सचा प्रवेश,६१,००० व्हिडीओ,२४,००० ऑडिओ कॅसेट्स



इतकी विशाल माहिती हाताशी असताना ही संसाधने वापरणाऱ्यांची संख्या नगण्य आहे, हे संसदीय कामकाजाच्या गंभीरतेवर प्रश्नचिन्ह उभे करते.

### नियमित वाचकांची दुर्मिळ यादी

संसदेच्या ग्रंथालयात नियमित येणाऱ्या खासदारांची संख्या हातावर मोजण्याइतकी आहे. त्यामध्ये प्रमुख नावे अशी–

- जयराम रमेश
- सुप्रिया सुळे
- जॉन ब्रिट्टास
- हरीभाई पटेल
- जुगल किशोर शर्मा
- रामजी लाल सुमन
- प्रियंका चतुर्वेदी
- गिरधारी लाल यादव
- एस. निरंजन रेड्डी
- एम. पी. अब्दुस्समद
- समदनी

या काही मोजक्या खासदारांव्यतिरिक्त बहुतेक खासदार ग्रंथालयाची पायरीही चढत नाहीत.

सामान्य नागरिकांना प्रवेश नाही, पण डिजिटल सुविधा उपलब्ध.संसद ग्रंथालयाचा लाभ घेण्याचा हक्क प्रामुख्याने खासदार आणि संसद सचिवालयातील अधिकाऱ्यांनाच आहे. माजी खासदार आणि मान्यताप्राप्त पत्रकारांनाही मर्यादित प्रवेश दिला जातो.

सामान्य जनतेला प्रत्यक्ष प्रवेश नाही मात्र ऑनलाइन नोंदणीद्वारे डिजिटल संसाधनांचा उपयोग करता येतो.

वाचनाची सवय कमी होत असून, संसदेतील चर्चांची पातळी, अहवालांचा अभ्यास, विधेयकांवर सखोल चर्चा यावरही याचा गंभीर परिणाम होत असल्याची भीती ग्रंथालय अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. लाखो दस्तऐवज, पुस्तके आणि संशोधन साहित्य असूनही ग्रंथालय 'शोभेची वास्तू' बनत चालले असल्याचे ते सांगतात.

देश चालवणाऱ्यांनीच वाचनाकडे पाठ फिरवली, तर लोकशाहीचे ज्ञान-आधारित मूल्य टिकेल कसे ?

असा सवाल आता देशात गांभीर्याने चर्चिला जात आहे.

# छत्रपतींच्या विचारांचा वारसा जपा; निर्भयपणे काम करा – श्रीकांत डांगे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांच्या विचारांचा वारसा पुढे नेत निर्भयपणे कार्य करावे आणि संघटनेचा लौकिक वाढवावा, असे आवाहन संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी केले. डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहाच्या पटांगणात संभाजी आरमारच्यावतीने आयोजित विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे यांनी केले. मेळाव्यात विद्यार्थी संघटनेच्या नव्या निवडी जाहीर करण्यात आल्या. शहरप्रमुखपदी गणेश नागणे यांची निवड झाली. तर उपशहरप्रमुखपदी रोहित वाघमारे, शुभम दासरी, आर्यन घुले, प्रदीप आडम यांची




निवड करण्यात आली.

संपर्कप्रमुख नीलेश मोटे, सचिव शुभम खंडागळे, सहसचिव रोहन घुले, तर संघटकपदी आदित्य आडम, समर्थ डोंगरे, सुदर्शन शिवसिंगवाले, विवेक हलसगी यांची निवड झाली. प्रसिद्धीप्रमुखपदी यश कांबळे यांची निवड जाहीर करण्यात आली.

यावेळी अजिंक्य पाटील यांच्यासह नव्या पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मेळाव्यास संघटनेचे उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, शहरप्रमुख सागर ढगे, दक्षिण तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर डोंबाळे, तसेच सोमनाथ मस्के, अर्जुन शिवसिंगवाले, राज जगताप, द्वारकेश बबलादीकर, राजू रच्चा, प्रदीप मोरे यांच्यासह सोलापूर शहरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीष काळे यांनी केले, तर आभार गिरीश देवकते यांनी मानले.

# सचिन जगताप यांचा वांगी येथे जंगी सत्कार



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** संभाजी ब्रिगेडच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी नुकतीच निवड झाल्याने. सचिन बापू जगताप यांची निवड ही संघटनेच्या कार्यकर्त्यांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या निवडीच्या पार्श्वभूमीवर वांगी नं. ३ येथे जगताप यांचा जंगी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यकर्ते, पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला पाहिजे तशी गर्दी केली.

कार्यक्रमास जिल्हा व तालुका कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून जगताप यांच्या कायाची दखल घेत स्तुतिसुमने अर्पण केली. यामध्ये शिवश्री गणेश सव्वासे (जिल्हा सचिव), शंकर पोळ (जिल्हा उपाध्यक्ष), अमित घोगरे (तालुकाध्यक्ष करमाळा), अजय गायकवाड (तालुकाध्यक्ष-कार्यवाह), तसेच संभाजी ब्रिगेड वाहतूक आघाडीचे तालुका उपाध्यक्ष शिवाजी कदम यांचा समावेश होता. वैभव कांबळे, प्रतीक कांबळे, ऋतिक कांबळे, श्रीधर चौधरी, विजय चोपडे यांसह विविध कार्यकर्त्यांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली. पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमात बोलताना जगताप यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.

त्यांनी नमूद केले की, 'संभाजी ब्रिगेडचे संघटन बळकट करण्यासाठी आणि शिवचरित्रावर आधारित विचारप्रवाह जनमानसात पोहोचवण्यासाठी जगताप यांचे नेतृत्व मोलाचे ठरणार आहे.'

तसेच, 'पश्चिम महाराष्ट्रात सामाजिक भान वाढवणारे, इतिहास संवर्धन करणारे आणि युवकांना दिशा देणारे उपक्रम आता आणखी गतीने राबवले जातील,' असेही ते म्हणाले.

आपल्या मनोगतात सचिन बापू जगताप यांनी संघटनेचा विस्तार आणि सामाजिक प्रश्नांवरील प्रभावी काम ही आपली प्राथमिकता असल्याचे स्पष्ट केले.

'युवकांना एकत्र आणून विकासाभिमुख उपक्रम राबवण्यात संघटना सातत्याने पुढे राहील. समाजहिताची प्रत्येक चळवळ दृढनिश्चयाने पुढे नेऊ,' असे ते म्हणाले. यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते जगताप यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा उपलब्ध होणार

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** कर्करोगाचे वाढते प्रमाण व कर्करोग उपचाराचे गांभीर्य विचारात घेता राज्यातील जनतेस सर्वसमावेशक कर्करोग सेवा राज्य शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने दिलेल्या सूचनेनुसार ह्यआसाम कॅन्सर केअर मॉडेलच्याह्ण धर्तीवर राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा एल 1, एल 2, एल 3 उपलब्ध होणार आहेत. एल 1 या स्तरामध्ये टाटा स्मारक रूग्णालय ही कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून काम करणार आहे. एल 2, एल 3 या स्तरावर असणाऱ्या या रूग्णालयात कर्करोगासंबधित प्रशिक्षण मनुष्यबळ निर्माण करणे तसेच या आजाराविषयी संशोधन कार्यात प्रगती करण्यात येणार आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाने याबाबत धोरण निश्चित केले आहे. जिल्हास्तरावर सुरू होणाऱ्या उपचारामुळे अनेक कर्करोगग्रस्त रूग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा वेळ वाचणार असून स्थानिक जिल्ह्यातच आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असल्याने या रूग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा (एल 1,एल 2,एल 3) रुग्णालये

राज्यात त्रिस्तरीय समग्र कर्करोग उपचार सेवा उपलब्ध होणार आहेत. छ1 मध्ये टाटा स्मारक रूग्णालय ही कर्करोगाकरिता शिखर संस्था म्हणून काम करणार आहे. एल 2 या स्तरावरती कायमस्वरूपी संपूर्ण कर्करोग शिक्षण व सेवा असेल यामध्ये छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, नागपूर, मुंबई (जे.जे.), कोल्हापूर, पुणे (बैरामजी जिजीभॉय शासकीय महाविद्यालय), नांदेड येथील सात शासकीय महाविद्यालयांशी संलग्नित रूग्णालये, नाशिक व अमरावती येथील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील दोन संदर्भ सेवा रूग्णालयांचा यामध्ये समावेश आहे. अशी नऊ केंद्रे एल 2 मध्ये समाविष्ट आहेत. एल 3 यास्तरामध्ये मध्ये कर्करोग निदान आणि डे-केअर रेडिओथेरिपी व किमोथेरिपी युनिटस यामध्ये कार्यरत असणार आहेत. अंबाजोगाई (बीड), यवतमाळ, मुंबई (कामा व आल्ब्लेस रूग्णालय), सातारा, बारामती, जळगाव व रत्नागिरी येथील शासकीय महाविद्यालयांशी संलग्नित सात रूग्णालये, ठाणे जिल्हा रूग्णालय संलग्नित व शिर्डी संस्थानचे रूग्णालय अशी एकूण नऊ केंद्रे एल 3 म्हणून कार्यरत होतील. एल 2 स्तरामध्ये व एल 3 स्तरामध्ये एकूण 18 रूग्णालये कार्यरत असतील. एल 3 स्तरावरील कर्करोग रूग्णालयांचे बांधकाम शासनामार्फत होऊन ही रूग्णालये सार्वजनिक खासगी भागीदारी तत्वावर उभारण्यात येतील मात्र, या रूग्णालयावर शासनाचे सर्व नियंत्रण असेल.

### मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाकेअर फाउंडेशनची स्थापना

एल २ व एल ३ स्तरावरील आरोग्य संस्थांना आवश्यकतेनुत्तार मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, संस्थांचे व्यवस्थापन करणे, पीपीपी धोरण राबविणे तसेच इतर अनुषंगिक बाबी पार पाडणे इ. बाबींकरिता मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कंपनी कायदा, २०१३ मधील सेक्शन-८ अंतर्गत महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फांउडेशनह्व महाकेअर फांउडेशन (MAHACARE Foundation) ही कंपनी स्थापन करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार संबंधित जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना निमंत्रित सदस्य म्हणून समाविष्ट करण्यात येईल. त्रिस्तरीय कर्करोग सेवा देणाऱ्या या संस्थाच्या योग्य समन्वयासाठी सिंगल क्लाऊड कमांड आणि कंट्रोल असेल. एल 2 स्तर रुग्णालयामध्ये कर्करोगासंबधी पदव्युत्तर व अतिविशेषोपचार शिक्षण एमडी, एएस, डीएम, एमसीएच, डीएनबी फेलोशिप उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. रुग्णसंख्या व शैक्षणिक बाबी यांसाठी भविष्यातील मागणी विचारात घेता एल 2 स्तरावरील संस्थांचे रूपांतर एल 1 संस्थेत करणे तसेच भविष्यात या संस्थांच्या संख्येत वाढ देखील

# शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी !

## ज्वारी-गहू-हरभरा स्पर्धांना उत्साह

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी शेतकरी विविध प्रयोगशील तंत्रांचा अवलंब करीत आहेत. अशा नवकल्पनाशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या मनोबलात वाढ करणे आणि त्यांच्या यशस्वी पद्धती इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा उद्देश ठेवून राज्यांतर्गत पीकस्पर्धा योजना राबविली जात आहे.

या माध्यमातून शेतकऱ्यांना तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर बक्षिसांनी गौरविले जाणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

### ५ पिकांसाठी रब्बी हंगाम २०२५ मध्ये स्पर्धा

कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम २०२५ साठी सर्वसाधारण आणि आदिवासी गटांत ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या पाच पिकांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

### स्पर्धेत सहभागी होण्यासाठीची अटी:

- शेतकऱ्याकडे स्वतःच्या नावावर जमीन असणे आणि ती स्वतः कसत असणे आवश्यक.
- एका शेतकऱ्याला एकापेक्षा जास्त पिकांसाठी अर्ज करता येईल.
- संबंधित पिकाची किमान ४० आर सलग लागवड असणे आवश्यक.
- अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख – ३१ डिसेंबर २०२४.

### प्रवेश शुल्क व बक्षिसे

प्रवेश शुल्कः–

- सर्वसाधारण गट – ₹३०० प्रति पीक
- आदिवासी गट – ₹१५० प्रति पीक

**बक्षिसांचे तपशील:–**

**तालुका स्तर**

- प्रथम – ₹५,०००
- द्वितीय – ₹३,०००
- तृतीय – ₹२,०००

**जिल्हा स्तर**

- प्रथम – ₹१०,000
- द्वितीय – ₹७,000
- तृतीय – ₹५,000

**राज्य स्तर**

- प्रथम – ₹५०,000
- द्वितीय – ₹४०,000
- तृतीय – ₹३०,000

शेतकऱ्यांना आपले प्रयोग व अनुभव सिद्ध करण्याची ही उत्तम संधी असल्याचे सांगत सोलापूरचे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सर्व शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# महाराष्ट्र सदन येथे १२ ते १४ डिसेंबर दरम्यान 'महाराष्ट्र खाद्य महोत्सव'

**नवी दिल्ली, (वृत्त सेवा):-** महाराष्ट्राच्या खमंग खाद्य पदार्थांचा आस्वाद दिल्लीकरांना मिळावा या उद्देशाने राजधानी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात महाराष्ट्र खाद्य महोत्सवाचे आयोजन 12 ते 14 डिसेंबर 2025 दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आणि सचिव आर. विमला यांनी दिली.

कस्तुरबा मार्गावरील महाराष्ट्र सदनात आयोजित या महोत्सवात महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक खाद्यसंस्कृतीचा आणि कलेचा संगम पाहायला मिळणार आहे. चवदार पदार्थांची रेलचेल दिल्लीकरांना या निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे.

### प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते उद्घाटन; पाककृतींची मेजवानी

या खाद्य महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते होणार आहे. खाद्य महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ उपलब्ध असतील. नागपूर विभागातील सावजी चिकन, मटण रस्सा, तर्री पोहा आणि संत्री-आधारित मिठाई; पुणे भागातील मिसळ-पाव, वडा पाव आणि पुरणपोळी, जळगावातील शेव भाजी, वांग्याचे भरित आणि केळीशी संबंधित पदार्थ; मालवणातील मालवणी सीफूड, कोंबडी वडे आणि सोलकढी; छत्रपती संभाजी नगरमधील नान कालिया, डालिंबी उसळ आणि स्थानिक बिर्याणी; तसेच कोल्हापुरी नॉन-व्हेजमधील तांबडा रस्सा, पांढरा रस्सा आणि कोल्हापुरी चिकन किंवा मटण यांचा समावेश असेल. हे पदार्थ महाराष्ट्राच्या समृद्ध पाककृती परंपरेचे प्रतिनिधित्व करतील.

या खाद्य महोत्सवात सातारा, कोल्हापूर, जळगाव,पुणे अमरावती, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतर्गत असलेले महिला स्वयंम सहायता समूह सहभागी होणार असून त्यांच्याकडील रुचकर पदार्थांचा देखील गरमागरम आस्वाद घेता येणार आहे.

### सांस्कृतिक कार्यक्रम आणि बालकांसाठी विशेष आकर्षण

हा महोत्सव केवळ खाद्यपदार्थांपुरता मर्यादित नसून, महाराष्ट्राची समृद्ध कला आणि संस्कृती दर्शवणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.लहान मुलांसाठी खास आकर्षण म्हणून 'करमणूकीचे'चे खेळ आणि जादूचे प्रयोग याचे आयोजन करण्यात आले. ज्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना या महोत्सवाचा आनंद घेता येईल.

### महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्टॉलद्वारे पर्यटन स्थळांचे दर्शन

या महोत्सवात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा (एमटीबीसी) विशेष माहिती स्टॉल देखील असणार आहे. या स्टॉलद्वारे महाराष्ट्रातील ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटन स्थळांची माहिती देण्यात येईल. पर्यटन स्थळांच्या माहितीपत्रकांचे वितरण करून महाराष्ट्राच्या पर्यटनाला अधिकाधिक चालना देण्याचा मानस असल्याचे निवासी आयुक्त आर. विमला यांनी यावेळी सांगितले.

**CHANGE IN NAME**
I am changing my name from **YUVRAJ UMAKANT MALAGE** to **YUVRAJ UMAKANT MALGE** for passport issuance.

**CHANGE IN NAME**
I am changing my name from **MHADEVI MANMATH WARAD** to **MAHADEVI MANMATHAPPA WARAD** for passport issuance.

**CHANGE IN NAME**
I am changing my name from **MANMATH BASAPPA WARAD** to **MANMATHAPPA BASAPPA WARAD** for passport issuance.

## ग्रामपंचायत ढवळस ता.माढा जि.सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत ढवळस,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.लेखाशिषः१५वा वित्त आयोग

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | पाणी पुरवठा सोय करणे देवीचे मंदिर ढवळस. | १,७९,६८१/- | २,000/- | २00/- | ६ महिने | खुला |
| २) | पाणी पुरवठा सोय करणे व्यायाम शाळा ढवळस. | १,७९,९९४/- | २,000/- | २00/- | ६ महिने | खुला |
| ३) | कोल्हापूर देवीचे मंदिर येथे पाणी पुरवठा सोय करणे ढवळस. | २,00,000/- | २,000/- | २00/- | ६ महिने | खुला |
| ४) | पाणी पुरवठा सोय करणे शिंदे वस्ती ढवळस. | १,७९,९९४/- | २,000/- | २00/- | ६ महिने | खुला |


टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.०३/१२/२०२५ स. १०.०० पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.०९/१२/२०२५ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय ढवळस ३) निविदा उघडणेचा दि.१०/१२/२०२५ रोजी दु.०२.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ढवळस,
ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत ढवळस,
ता.माढा,जि.सोलापूर

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) डोळे, नयन
२) काव्य, कविता
३) भाजप पक्षाचे नाव पूर्ण लिहा
४) सीतापती ५) वेळ वाया न घालवता, पटकन ६) न भिणारा ७) श्वास घेण्याचे इंद्रिय १०) नस उलट लिहा
१२) पाय १५) स्वस्तच्या विरूध्दार्थी
१७) समुद्राच्या पाण्याची चव
१८) बसपाचे निवडणूक चिन्ह
१९) वभ उलट लिहा
२०) जंगलातील प्राण्यांचा राजा
२१) स्वभावाने रागीट २४) शपथ (हिंदीत) २५) दमयंती पती २६) आईची बहीण २८) भाकरी थापण्याची मोठी थाळी ३०) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत
३१) कामातून मिळालेला मोकळा वेळ
३२) अस्वलांचे खेळ दाखविणारा
३५) जुनाच्या विरूध्दार्थी
३६) दहा आणि सात मिळून होणारी संख्या
३७) लोखंडी आकडा, हुक
३९) शहर
४१) मास, महिना
४२) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक
४३) एक म्हण-** घर पोकळ वासा

**आडवे शब्द :** १) संसदेचे एक सभागृह
४) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे मुख्य नेते
८) स्वाद, रूची ९) पध्दत (हिंदीत)
११) सततची केलेली मागणी, तगादा १३) ख्रिश्चन धर्मसेविका
१४) दोन आणि एक मिळून होणारी संख्या
१५) राशीचक्रातील एक रास १६) फुलांची माळ, पराभव
१७) एक म्हण-** तशी माती
१८) भारतीय निवृत्त फिरकी गोलंदाज
२१) धातूचा बारीक तंतू २२) जंगल, अरण्य
२३) लगेच, तातडीने २७) दह्यात पाणी मिसळून घुसळलेले पेय
२८) सूर्योदयापूर्वीचा उषःकाल २९) मनाला टोचणी लावणारे शल्य
३०) डासांमुळे थंडी वाजून येणारा ताप ३१) रास उलट लिहा
३२) संयम, धमकी देणे, धाप लागणे ३३) मक्षिका ३४) वतनाचा मालक
३७) दुर्ग, किल्ला ३८) बैलाच्या नाकात घातलेली दोरी
४०) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४३) कपाची जोडीदार ४४) मार्ग, रस्ता (हिंदीत)
४५) राजाचे निवासस्थान ४६) बे दुणे

## सुडोकु - 117

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | 8 | 4 | 1 | | | | 9 |
| 5 | | 1 | | 2 | | 4 | 7 | |
| | 2 | 9 | | 6 | | | | |
| | 3 | | | | 7 | 6 | 9 | 4 |
| | 4 | 5 | 3 | | | 8 | 1 | |
| 1 | | | | | | 3 | | |
| 9 | | 4 | 6 | 7 | 2 | 1 | 3 | |
| 6 | | | | | | 7 | | 8 |
| | | | 8 | 3 | 1 | | | |

# शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी जोडीने बजावला मतदानाचा हक्क



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** तत्कालीन अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी, अकलूज नगरपरिषद निवडणूक मतदानाचा हक्क जोडीने बजावून, नागरिकांना मतदान करण्याचा संदेश दिला.

अकलूज नगरपरिषदेची स्थापना 03/08/2021 रोजी मोठ्या संघषार्तून झाली. सर्व मोहिते पाटील कुटुंब यांच्यासह अकलूज करांनी, अकलूज ग्रामपंचायतीचे रुपांतर, अकलूज नगरपरिषद मध्ये व्हावे म्हणून साखळी उपोषण सुरू केले आणि या त्यांच्या अभूतपूर्व संघषार्ला यश आले. आणि अकलूज ग्रामपंचायतीचे, अकलूज नगरपरिषद मध्ये रुपांतर झाले.

तीन चार वर्षाच्या प्रदीर्घ प्रतीक्षा नंतर अकलूज नगरपरिषदेच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आणि 02/12/2025 रोजी अकलूज – माळेवाडीच्या नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला, तर जोडीने अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी मतदानाचा हक्क बजावत नागरिकांना मतदान करण्याचा संदेश दिला.

# जागतिक एड्स दिनानिमित्त सायकल जनजागरण रॅली

## ५०० सायकलस्वार युवक युवतीचा सहभाग



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग सोलापूर, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय जिल्हा रुग्णालय, सोलापूर, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर, डॉ. वैशंपायन स्मृती शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर, रोटरी क्लब ऑफ सोलापूर, जिल्हा विधी व सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिना निमित्त दि. १ डिसेंबर २०२५ रोजी जनजागरण सायकल रॅली काढण्यात आली.

रॅलीच्या प्रारंभी सर्व मान्यवरांचे व रॅलीमध्ये सहभाग नोंदवीलेल्या विदयार्थ्याचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. व्हि.एम. जी.एम.सी.सोलापूर ए.आर.टी. प्लस सेंटरच्या वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस – वरेरकर यांनी केले आणि या वषीर्चे जागतिक एड्स दिनाचे घोषवाक्य "अडथळयांवर मात करु, एकजूटीने एचआयव्ही/ एड्स ला लढा देवू, नव परिवर्तन घडवू " या बद्दल माहिती दिली.

रॅलीच्याच्या उद्घाटनाप्रसंगी सोलापूर जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी म्हणाले की, एच.आय.व्ही. ग्रस्त व्यक्तींविषयी असलेला भेदभाव व सामाजिक कलंक दूर करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. एच.आय.व्ही. एड्स प्रतिबंधाच्या कार्यात सातत्य असल्याने या रोगाविषयी असलेली भीती कमी झाले आहे. हा उपक्रम समाजात योग्य माहिती पोहोचवून निरोगी व संवेदनशील समाजनिर्मितीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांनी सोलापूर जिल्हयातील ग्रामिण व उपजिल्हा रुग्णालय येथे मोफत एच.आय.व्ही. समुपदेशन, रक्तचाचणी व रुग्णांना मिळणारे औषधोपचार या सर्व सुविधा प्रभावीपणे राबविल्या जातात या बद्दलची माहिती दिली व सदर कार्यक्रमामध्ये सहभागी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्याचे कौतुक केले.

अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांनी रॅलीच्या नियोजनाचे तोंड भरुन कौतुक केले. एचआयव्ही/एड्स या आजाराबाबत समाजामध्ये असणारे गैर समज हे सर्व कर्मचाऱ्यांच्या अनेक वषार्पासूनच्या सातत्यपूर्ण प्रयत्नाने खूप कमी झाले आहे. या क्षेत्रात काम करणारे कर्मचारी हे अत्यंत धाडसाने व प्रामाणिकपणे याआजाराच्या रुग्णांना समुपदेशन, रक्तचाचणी, औषधोपचार, इतर शासकिय योजना व संदर्भ सेवांचा लाभ मिळवून देतात म्हणूनच रुग्णांचे आयुर्मान वाढले असल्याचे त्यांनी सांगितले.

रॅलीच्या सुरुवातीला एड्स बाबत जनजागृती व एचआयव्हीसह जगणाऱ्या विषयी आस्थेचे प्रतिक असणारी शपथ उपस्थित सर्वांना देण्यात आली.

जागतिक एड्स दिन २०२५ एचआयव्ही/एड्स जनजागृती सायकल रॅलीचे उद्घाटन सोलापूरचे अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, डॉ. व्हि. एम. जी.एम.सी. सोलापूरचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून व रॅलीस हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

यावेळी विभाग प्रमुख डॉ. विजय चिंचोळकर, सुक्ष्मजीव शास्त्र विभाग, विभाग प्रमुख डॉ. नागेश गड्डम, त्वचारोग विभाग, विभाग प्रमुख डॉ. प्रदिप गाडगीळ, शासकिय रक्तपेढी, डॉ. व्हि.एम.जी. एम.सी.सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया शाखा सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरचे मा. ॲडव्होकेट लक्ष्मण मारडकर, महिला व नवजात शिशु रुग्णालय, सोलापूरच्या वैद्यकिय अधिक्षक डॉ. जयश्री ढवळे, डॉ. अग्रजा चिटणिस, रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर, सचिव निलेश पोफलिया, जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास शासकिय व निमशासकिय संस्थेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायकल रॅली जिल्हा रुग्णालय, गुरुनानक चौक येथून सुरु होवून गुरुनानक चौक, तालूका पोलिस स्टेशन, शानदार चौक, गेटयाल चौक, पाथरुड चौक, संजय गायकवाड चौक, सिध्दार्थ सोसायटी, मौलाली चौक, सोलापूर ऑफिसर क्लब या मागार्ने निघून समारोप ही जिल्हा रुग्णालयात करण्यात आला. जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ. वर्षा डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सायकल रॅलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सुत्रसंचालन दिनेश राठोड, सुनावी शेख व कपिल भालेराव यांनी केले. स्वागत गीत वंदना तिनईकर यांनी गायले तर आभार डॉ. सुनीता गायकवाड यांनी केले.

# जिल्हा क्रीडा पुरस्कारसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्हयातील उत्कृष्ट क्रीडा व खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने जिल्हयातील खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांचे करिता शासनातर्फे जिल्हा क्रीडा पुरस्कार दिला जातो.

गुणवंत क्रीडा मार्गदर्शक – (01), गुणवंत खेळाडू (01 महिला, 01 पुरुष, व 01 दिव्यांग खेळाडू) सदर पुरस्कारासाठी दिनांक 01 जुलै ते 30 जून या कालावधीसाठी मागील खेळाडूंसाठी पाच वर्षाची कामगिरी विचारत घेतली जाईल तसेच क्रीडा मार्गदर्शकासाठी दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल. पुरस्काराचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.– प्रमाणपत्र– प्रत्येकी 2. स्मृतीचिन्ह प्रत्येकी 3. रोख रक्कम रुपये 10,000/– (दहा हजार रुपये) प्रत्येकी. जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करणा–या अर्जदा–याचे त्या जिल्हयात किमान 15 वर्ष वास्तव्य असले पाहिजे. क्रीडा मार्गदर्शक म्हणून सतत दहा वर्ष महाराष्ट्रात क्रीडा मार्गदर्शकाचे कार्य कलेले असले पाहिजे. व त्याने वयाची 35 वर्ष पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. खेळाडूंने पुरस्कार वर्षासह लगतपूर्व 05 (पाच) वर्षापेकी 02 (दोन) वर्षे त्या जिल्हयाचे मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत स्पर्धेमध्ये प्रतिनिधीत्व केले असले पाहिजे.

क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या 10 वर्षात किमान वरिष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला (खेलो इंडिया) मथील राष्ट्रीयस्तरा पर्यंत पदक विजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील, सांधिक अथवा वैयक्तिक मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरिष्ठ राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेला खेळाडू अथवा राज्य/जिल्हा अजिक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यंत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक विहीत नमुन्यातील अर्ज संघटनेमार्फत अथवा वैयक्तिक रित्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. तरी संबधितांनी अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्याशी संपर्क साधून विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक 23 डिसेंबर 2025 पर्यंत परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# MPSC स्पर्धा परिक्षांचे वेळापत्रक जाहिर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन 2026 मधील नियोजित विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या http:// mpsc.gov.in व http:// mpsconline.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव र. प्र. ओतारी यांनी कळविली आहे.

प्रस्तावित वेळापत्रकानुसार सन 2026 मध्ये राज्य सेवा मुख्य परीक्षा–2025, महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा–2025, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा–2025, महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा–2025, महाराष्ट्र गट– ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा–2025, महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त परीक्षा–2025, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित परीक्षा–2026, महाराष्ट्र गट– ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा–2026 व महाराष्ट्र गट– क सेवा संयुक्त परीक्षा–2026 इत्यादी परीक्षा होणार आहेत, असेही कळविण्यात आले आहे.

# ज्ञानेश्वर महाराज प्रगट दिनानिमित्त पारायण व अखंड हरिनाम सप्ताह



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** ज्ञानसम्राट श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या प्रगट दिनानिमित्त दि.५ ते १२ डिसेंबर या कालावधीमध्ये भव्य ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन विमानतळासमोरील गांगजी पार्क येथे करण्यात आले आहे, अशी माहिती अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे शहराध्यक्ष ह.भ.प. संजय पवार महाराज यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज राष्ट्रीय अध्यक्ष भाविक वारकरी मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली व ह.भ.प. संजय पवार महाराज यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम होणार आहे. होटगी रोड, जुळे सोलापूर, कुमठे परिसरातील सर्व भजनी मंडळ व भाविक यांच्यावतीने व अखिल भाविक वारकरी मंडळ शहर जिल्हा यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये ह.भ.प. मन्मत महाराज बहिरमल, ह.भ.प. पुरषोत्तम महाराज सुतार, ह.भ.प. निळोबा महाराज शिरसट, ह.भ.प. माऊली बचुटे महाराज, ह.भ.प. लक्ष्मन महाराज चव्हाण, ह.भ.प. गोपाळ लोंढे यांची सायंकाळी ५ ते ६ यावेळेत प्रवचने होणार आहेत.

महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज, ह.भ.प. कृष्णा चवरे महाराज (पंढरपूर), ह.भ.प. प्रकाश साठे महाराज (बीड), ह.भ.प. उमेश दसरथे महाराज (देवाची आळंदी, ह.भ.प. अनिल पाटील महाराज बाभळगावंकर, ह.भ.प. रामराव ढोक महाराज (नागपूर), ह.भ.प. गुरुवर्य प्रभाकरदादा बोधले महाराज (पंढरपूर) यांची हरिकिर्तने होणार आहेत. ह. भ. प. नामदेव पवार महाराज (श्रीगोंदा) हे ज्ञानेश्वर महाराज व्यासपीठाचे प्रमुख म्हणून उपस्थित राहणार आहेत.

दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता भव्य दिंडीची नगर प्रदक्षिणा होऊन दुपारी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. गुरुवर्य बापूसाहेब देहूकर महाराज (पंढरपूर) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर सर्वांसाठी महाप्रसाद होऊन सप्ताहाची सांगता होणार आहे. या सप्ताहाचे वैशिष्ट्ये म्हणजे ७५० ज्ञानेश्वरी वाचक पारायणसाठी बसणार आहेत. रविवार, दि. ७ डिसेंबर रोजी रेस्पायर क्लिनिक, रामलाल चौक यांच्या वतीने महाआरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, तसेच या शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय यांच्यावतीने मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस पांडुरंग माने, दीपक हरवाळकर, काशिनाथ सुरवसे, प्रकाश माने, मनोज कासार, अप्पा माने, मधुकर जाधव, बसवराज पनशेट्टी आदी उपस्थित होते.

# जन्मठेप झालेल्या आरोपीस उच्च न्यायालयात जामीन मंजूर: ॲड. जयदीप माने



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** मरवडे, ता. मंगळवेढा येथे दिलीप साहेबलाल नदाफ याचा लोखंडी टॉमी डोकीत मारून खून केल्या प्रकरणी मयताचा चुलत भाऊ सैफन बंडू नदाफ (रा. बनतांडा, ता. मंगळवेढा) याला पंढरपूर सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सदर शिक्षेविरुद्ध आरोपी सैफन बंडू नदाफ याने मुंबई उच्च न्यायालयात अपील व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंच चे न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक व न्यायमूर्ती अजित कडेठाणकर यांच्या खंडपीठासमोर होऊन न्यायमूर्तींनी आरोपीची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले.

मयत दिलीप नदाफ व त्यांचा चुलत भाऊ सैफन नदाफ यांच्यामध्ये शेत जमिनीच्या हद्दीच्या कारणावरून भांडणे होत होती. घटनेच्या आदल्या दिवशी पुन्हा त्याच कारणावरून भांडणे झाली होती. घटने दिवशी आरोपीच्या वडिलांनी सदरचा हद्दीचा दगड हलवला, त्यामुळे झालेल्या भांडणात आरोपीने मयत दिलीप यांच्या डोक्यात टॉमी मारून खून केल्याच्या आरोपावरून मंगळवेढा पोलिसांनी आरोपी विरुद्ध दोषारोप पत्रक दाखल केले होते. या प्रकरणी उच्च न्यायालयात आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. पंकज देवकर यांनी काम पाहिले.

# आयुक्तांचा पाहणी दौरा; स्वच्छता, सार्वजनिक सुविधा सुधारण्यासाठी निर्देश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर शहरातील स्वच्छता, सार्वजनिक सुविधा व पायाभूत सेवांची गुणवत्ता तपासण्यासाठी आज पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या समवेत सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, विभागीय अधिकारी विजयकुमार लोखंडे, जावेद पानगल, राघवेंद्र गायधनकर, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान शहरातील विविध भागांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. काही महत्त्वाच्या अनियमितता व आवश्यक सुधारणा आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. याबाबत आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी तात्काळ कार्यवाहीचे निर्देश संबंधित विभागांना दिले. बुद्ध नगर फॉरेस्ट एरिया – ड्रेनेज समस्या व साफसफाई सार्वजनिक शौचालयाच्या ड्रेनेज लाईनबाबत उपलब्ध जोडण्यांची पुर्नतपासणी करून choke-up समस्या दूर करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच परिसरातील वाढलेली झुडपे तातडीने काढून स्वच्छता सुनिश्चित करण्यास सांगितले. सार्वजनिक नळांचा फेर सर्व्हेक्षण सर्व विभागीय कार्यालयांकडून घेतलेल्या सार्व. नळांच्या सर्व्हेमध्ये काही नळांचा समावेश नसल्याचे आढळल्याने पुन्हा एकदा सर्व्हेक्षण करून अचूक यादी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. निश्चित SOP नुसार अनधिकृत सार्व. नळ जोड बंद करणे व रहिवाशांना वैध सेपरेट नळजोड देण्याची प्रक्रिया गतीने राबविण्यास सांगितले.

सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती व नवीन बोअरची आवश्यकता रामवाडी, गुलाबनगर, मौलाली चौक, लोधी गल्ली परिसरातील शौचालयांची पाहणी करून काही ठिकाणी भूमिगत पाण्याच्या पातळीमुळे नवीन इलेक्ट्रिक बोअर घेण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. यासाठी सर्वेक्षण करून एकत्रित यादी पुढील 7 दिवसांत सादर करण्याचे सूचना दिल्या. पडीक व वापरात नसलेली सार्वजनिक शौचालये – Salvage Value आधारित पाडकाम योजना महापालिकेला कोणताही आर्थिक खर्च न येता, पाडकामातून मिळणाऱ्या स्क्रॅपचा मोबदला महसूल म्हणून मिळेल अशा Salvage Value आधारित पाडकाम योजनेसाठी प्रस्ताव तयार करण्याचे सूचना दिल्या. लोधी गल्ली – नवीन सार्वजनिक शौचालय, पाण्याच्या टाकीजवळील कंपाउंड, वॉललगत पुरुषांसाठी नवीन सार्वजनिक शौचालय उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. अरुंद बोळीत कचरा व्यवस्थापन घंटा गाडी न पोहोचणाऱ्या अरुंद बोळ्यांमध्ये अतिरिक्त महिला कर्मचारी नेमून कचरा उचलण्याची कार्यवाही तत्काळ सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले. या सर्व सूचनांनुसार संबंधित विभागांनी तात्काळ व प्रभावी कार्यवाही करून शहरातील स्वच्छता, सुविधा व सेवा सुधारणेचे निर्देश आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी दिले. सोलापूर महानगरपालिका नागरिकांना उत्तम नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व शहर स्वच्छतेसाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.


# आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

होय, आपणही 'मुक्त पत्रकार' होवून समाजात मानसन्मानसह प्रामाणिकपणे पैसे कमवा. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक 'मुक्त पत्रकार' होवू शकतो. त्यासाठी १०००/– रूपये भरून सभासद (वार्षिक वर्गणीदार) होणे आवश्यक आहे. सभासदास १०००/– रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक 'कटूसत्य' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून किंवा Dainik Solapur Katusatya, Bank of Maharashtra, AC:- 60438686652, IFSC:- MAHB0000627 या खात्यावर आपली रक्कम जमा करून सभासद व्हा. आणि 'मुक्त पत्रकार' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, आधरकार्ड आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठविल्यास या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:–** १)संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल 'जाहीरात उद्योजक' ओळखपत्र मिळेल. २) 'मुक्त पत्रकार' प्रिंट ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल खर्च २००/– रूपये द्यावे लागतील. (कार्यालयात येवून घेऊन गेल्यास खर्च घेणार नाही.) ३)बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार कार्यालयाकडे राखीव ठेवले जातील. ४) महाराष्ट्रातील कोणीही 'मुक्त पत्रकार' होवू शकतो. ५) आमच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ६) आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ७) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ८) सहा महिन्या नंतर 'मुक्त पत्रकार' म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ९) मग..! चला तर, आजच 'मुक्त पत्रकार' होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम – चला गाळूया घाम

**संपर्कासाठी पत्ता**

**कार्यालयः दै.कटूसत्य कार्यालय, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर. फोन:०२१७३५५०५९२,मो.९७६५३९०३३९**